# प्रेस नोट ता.०९/०२/२०२१

## अडीच वर्षापुर्वी झालेल्या रहस्यमयी खुनाचा झाला उलघडा

## आरोपींना अटक

## गुन्हे शाखा युनिट २ ची कारवाई

सहदेव मारुती सोळंके वय २७ रा. सावनगिरा ता.निलंगा जि.लातुर हा दहा वर्षापुर्वी त्याचे गावातुन पळुन येवुन पुण्याला विश्रांतवाडी येथे हॉटेलमध्ये कामाला लागला होता त्याला दारुचे व्यसन लागलेने तेथील कामधंदा सोडुन फिरत होता.काही दिवसानंतर पुन्हा त्याने चिंचवड स्टेशन येथील शंकर झेंडे उर्फ काक्या याचे जग्गुभाई हॉटेल मध्ये वेटर म्हणुन कामाला सुरवात केली त्या ठिकाणी त्याची ओळख आझाद मुल्लानी व शंकर ब्रम्हदेव शिंदे रा.ओटास्किम यांचेशी झाली होती ते ऐकमेकांचे चांगले मित्र झाले होते. शंकर झेंडे याचेशी पैशाचे व्यवहारातुन सहदेव सोळंके व आझाद मुल्लानी यांनी शंकर झेंडे याचा ऑगस्ट २०१७ मध्ये वाहनाने ठोकर मारुन अपघात घडवुन आणला का दिवसांनी तो खुन असल्याचे उघड होवुन खुनाच्या गुन्हयात आझाद मुल्लानी व सहदेव सोळंके यांना अटक होवून येरवडा जेलला होते. ते जामीनावर सुटल्यानंतर सहदेव हा सैरावैरा होवून कोणावरही दादागिरी करु लागला होता त्यामध्ये त्याचा मित्र शंकर ब्रम्हदेव शिंदे याला सुध्दा सतत दारु पिवुन शिवीगाळ करणे, लोकांमध्ये त्याचा अपमान करणे, दादागिरी करणे असे सहदेव हा करीत असल्याने शंकर शिंदे त्याचेवर चिडुन होता. शंकर शिंदे याने सहदेव यास समजावुन सांग नाहीतर मी त्याला ठार मारणार असे आझाद मुल्लानी यास सांगितले होते परंतु सहदेव याचे वागण्यात काहीही बदल झाला नाही.

सन २०१८ मधील ऑगस्ट महीन्याचे सुरवातीला सहदेव मारुती सोळंकी हा शंकर ब्रम्हदेव शिंदे याचेवर सतत दादागिरी करुन दारु पिवुन शिविगाळ करीत असल्याचे रागातुन १) शंकर ब्रम्हदेव शिंदे वय २७ वर्षे धंदा- स्क्रॅप खरेदी विक्री रा.मुळ लिमगाव जि.सोलापुर सध्या राहणार एल १०/१, सोमेश्वर मंदीराचे पाठीमागे मिलींदनगर सेक्टर नंबर २२ ओटास्किम निगडी याने त्याचे साथीदार २) रवि अशोक मोरे वय २७ वर्षे धंदा- खाजगी नोकरी रा.बी / ३/९ राजनगर ओटास्किम निगडी पुणे मुळगाव केडगाव चौफुला जि.पुणे ३) अमोल बसवराज वाले रा. मिलींदनगर ४) राज्या उर्फ मेघराज संजय वाले रा. मिलिंदनगर यांना दारु पिणेसाठी बोलवुन घेवून सहदेव मारुती सोळंकी यास ठार मारणेचा कट आखला व सहदेव यास बोलावुन घेवून दारु पाजली

त्यानंतर आझाद मुल्लानी याचे वापरातील लाल रंगाच्या झायलो गाडी नंबर एम एच १२ जीव्ही १८५२ मधुन सहदेव यास बाहेर जायचे आहे असे सांगुन झायलो गाडीतुन एमआयडीसीचे मोकळया मैदानात घेवून जावुन चौघांनी मिळुन शिविगाळ करुन मारहाण केली.त्यामध्ये सहदेव याने सुध्दा हातपाय मारल्याने शंकर शिंदे याने सहदेव सोळंकी याचे गळयात नॉयलायनची रस्सी टाकून रवि मोरे याने त्याचे दोन्ही हात धरले, मेघराज याने दोन्ही पाय दाबुन धरुन शंकर शिंदे व अमोल वाले यांनी नॉयलाईनची रस्सी दोन्ही बाजुने जोराने ओढुन सहदेव याचा गळा आवळुन ठार मारले.सहदेव याची बॉडी दिवसभर झायलो गाडीतच ठेवून शंकर याने त्याचा मित्र ५) आझाद मुल्लानी रा.मोरेवस्ती यास त्याचे घरी जावुन खुनाची माहीती सांगितली व त्याचेकडून दारु पिणेसाठी ३०००/- रुपये घेतले. दुस-या दिवशी रात्री सहदेव याचे प्रेत परंदेवाडी ते बेबेड ओव्हळ गावचे मधील नदीचे पुलावर घेवून जावुन प्रेताचे छाती पोटावर दगड बांधुन वाहते पाण्यात फेकून देवून विल्हेवाट लावली व पुरावा नष्ट केला.तब्बल दहा ते बारा दिवसांनी मृतदेह पाण्यातुन बाहेर आला त्यावेळी तो पुर्णपणे कुजलेल्या सडलेल्या अवस्थेत होता त्याचे पँटचे खिशात मिळालेल्या पॅनकार्डवरुन तो सहदेव मारुती सोळंकी याचा असल्याचे निष्पन्न झाल्याने तळेगाव दाभाडे पोलीस ठाणेकडे अकस्मात मयताची नोंद झाली.आरोपीत यांची खुनाचा गुन्हा लपल्याची खात्री झाल्याने कोणाला काही एक माहीती झाले नसल्याचे आविर्भावात फिरु लागले सदर घटनेला तब्बल अडीच वर्षे लोटली होती.

दिनांक ०८/०२/२०२१ रोजी गुन्हे शाखा युनिट २ कडील स्टाफ वाहनचोरीचे गुन्हयातील रेकॉर्डवरील गुन्हेगार चेकींग करीत असतांना पोलीस हवालदार शिवानंद स्वामी यांना त्यांचे गोपनीय बातमीदाराकरवी बातमी मिळाली कि, सहदेव मारुती सोळंकी याचा शंकर ब्रम्हदेव शिंदे ,रवि अशोक मोरे, अमोल वाले , मेघराज वाले सर्व रा. मिलींदनगर ओटास्किम निगडी यांनी रस्सीने गळा आवळुन खुन केला व प्रेत बेबेड ओव्हळ जवळील नदीचे पाण्यात फेकुन दिले अशी खात्रीशीर बातमी मिळालेने पोलीस निरीक्षक शैलेश गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली अंकुश चौक परिसरात सापळा लावुन शंकर शिंदे व रवि मोरे यांना गुन्हे शाखेकडील पथकाने शिताफीने अटक केली. आरोपींना चौकशीकामी गुन्हे शाखा युनिट २ कार्यालयात आणुन विश्वासात घेवून सखोल चौकशी केली असता त्यांनी सहदेव मारुती सोळंकी याचे खुनाची कबुली देवुन घटनास्थळ दाखविले. पोहवा शिवानंद स्वामी यांनी सरकार तर्फे दिले फिर्यादीवरुन तळेगाव दाभाडे पोलीस ठाणेत खुनाचा कट करुन खुन करणे, पुरावा नाहीसा करणे याबाबत गुन्हा दाखल करणेत आला आला आहे.आरोपी शंकर ब्रम्हदेव शिंदे, रवि अशोक मोरे यांना गुन्हयाचेकामी हजर करण्यात आले असुन अमोल वाले व मेघराज वाले यांचेविरुध्द मोका कायद्यान्वये कारवाई सुरु असल्याने अटकेत आहेत.गुन्हयाचा अधिक तपास तळेगाव दाभाडे पोलीस ठाणेकडून सुरु आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री कृष्ण प्रकाश, अप्पर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री सुधीर हिरेमठ, सहाय्यक पोलीस आयुक्त

गुन्हे  श्रीमती प्रार्थना कट्टे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट २ चे पोलीस निरीक्षक शैलेश गायकवाड, पोलीस उप निरीक्षक संजय निलपत्रेवार, पोलीस अंमलदार केराप्पा माने, दिलीप चौधरी, शिवानंद स्वामी, प्रमोद वेताळ, दिपक खरात, उषा दळे, जयवंत राऊत, वसंत खोमणे, विपुल जाधव, जमीर तांबोळी, नामदेव राऊत, अजित सानप, नामदेव कापसे, आतिष कुडके, शिवाजी मुंढे,यांचे पथकाने केली आहे.



चिंचवड
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय